संक्षिप्त खटला क्र.३२६७०५/२००७
शासन वि. देवेंद्र व इतर
नि.क्र.५१

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | – | प्रविण रामाजी नागदिवे |
| वय | – | ५७ वर्ष, |
| धंदा | – | पोलीस नियंत्रण कक्ष, नागपूर |
| राहणार | – | गोधनी, नागपूर |

<u>सरतपासणी–सहाय्यक सरकारी वकील ममता आवारीवार यांचेमार्फत शपथेवर सुरुः</u> –

१. सन २००७ मध्ये मी पोलीस स्टेशन सितबार्डी येथे शिपाई पदावर कार्यरत होतो. यातील घटना ही दिनांक २४.०९.२००७ रोजी सिताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये १८.३० वाजताचे सुमारास घडली. सदर दिवशी आम्ही झाशी राणी चौकामध्ये पेट्रोलींग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भारत व पाकीस्तान मध्ये क्रिकेट मॅचला काही इसम टिव्ही बघून सट्टा लावत आहे. त्यावेळी गस्तीवर मी, पीएसआय प्रदिप लांडे, आनंद वानखेडे, सतीश पांडे, तारासिंग जाधव, सुनिल बघेल व इतर होतो. आम्हाला गुप्त माहिती मिळताच आम्ही सर्वजण घटनास्थळावर म्हणजेच वंदना कोऑपरेटिव्ह सोसायटी मध्ये तळमजल्यावर गेलो. त्यावेळी आम्हाला तेथे पाच इसम टिव्ही बघून फोनवर सटा लावत असल्याचे दिसले. सदर इसमाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नावे देवेंद्र शिर्के, प्रशांत ढेंगरे, सुरेश मोटघरे, विक्की बधवार व अरविंद साखरे असे सांगितले. त्यांच्याकडून ,आम्हाला कागदी पान, एक डॉट पेन, टिव्ही व नगदी ४०,०००/– असा एकूण ९०,०५०/– किंमतीचा मुदेमाल मिळाला. सदर मुदेमाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी कारवाई करून जप्त केला. तपासादरम्यान तपासी अधिकारी

यांनी माझा जबाब दिनांक २७.०९.२००७ रोजी घेतला होता. आज रोजी न्यायालयामध्ये आरोपी क्र.४ वगळता इतर चारही आरोपी हजर आहेत. मी त्यांना ओळखतो. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी केला.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी क्र.५ तर्फे विद्यीज्ञ श्री. व्ही. व्ही. साखरे यांच्यामार्फत–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलींग मध्ये असलेल्या सर्व कर्मचा–यांबाबत स्टेशन डायरीला स्वतंत्र नोंद घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दिवशी पेट्रोलींगला उपस्थित नसल्याने त्याबाबत कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली नाही.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व ३ तर्फे विद्यीज्ञ श्री. आर. बी. ढोके यांच्यामार्फत–</u>**

३. मी माझे जबाबामध्ये घटनास्थळावरील आरोपींची नावे नमूद केलेली नाहीत. घटनेला बराच कालावधी उलटून गेल्याने प्रत्येक आरोपीचे नाव मी स्वतंत्ररीत्या सांगू शकणार नाही. त्यामधील एकाचे नाव मला सांगता येईल. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयामध्ये साक्षीकामी आल्यानंतर आज मला त्या एका आरोपीचे नाव सरकारी वकीलांकडून समजले. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी आरोपींना प्रथमच न्यायालयात पाहिले, घटनास्थळावर कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे विद्यीज्ञ श्री. पी. आर. भूरे यांच्यामार्फत–</u>**

४. जप्त टिव्ही कोणत्या कंपनीचे होते त्याचा खुलासा मी माझे पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुदेमाल जप्त करण्याच्या कारवाईवेळी मी तेथे उपस्थित नव्हतो. घटनेवेळी घटनास्थळावर आम्ही खाजगी वाहनाने गेलो होतो. मी पोलीसांना जबाब देतेवेळी कोणत्या वाहनाने गेलो ही बाब नमूद केली होती. आता मला माझा जबाब दाखविण्यात

आला माझे जबाबामध्ये तशी बाब नमूद करण्यात आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणतीही कारवाई झाली नाही व मी आरोपींना पहिल्यांदाच न्यायालयात पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी भारत पाकीस्तान यांच्यामध्ये कोणताही क्रिकेटचा सामना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.02.05 17:39:16 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेश मराठे)**

**दि.०५/०२/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.**

**कोर्ट क्र.१**

संक्षिप्त खटला क्र.३२६७०५/२००७
शासन वि. देवेंद्र व इतर
नि.क्र.५२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नांव | – | सुनिल शामलाल बघेल |
| वय | – | ५७ वर्ष, |
| धंदा | – | सेवानिवृत्त |
| राहणार | – | राम नगर, तेलंगखेडी, नागपूर |

**सरतपासणी–सहाय्यक सरकारी वकील ममता आवारीवार यांचेमार्फत शपथेवर सुरु: –**

१. सन २००७ मध्ये मी पोलीस स्टेशन सितबार्डी येथे शिपाई पदावर कार्यरत होतो. यातील घटना ही दिनांक २४.०९.२००७ रोजी सिताबर्डी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये १८.३० वाजताचे सुमारास घडली. सदर दिवशी आम्ही झाशी राणी चौकामध्ये पेट्रोलींग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, भारत व पाकीस्तान मध्ये क्रिकेट मॅचला काही इसम टिव्ही बघून सट्टा लावत आहे. त्यावेळी गस्तीवर मी, पीएसआय प्रदिप लांडे, प्रविण नागदेवे व इतर होतो. आम्हाला गुप्त माहिती मिळताच आम्ही सर्वजण घटनास्थळावर म्हणजेच वंदना कोऑपरेटिव्ह सोसायटी मध्ये तळमजल्यावर गेलो. त्यावेळी आम्हाला तेथे पाच इसम टिव्हीवर भारत–पाकीस्तान मॅच बघून फोनवर सटा लावत असल्याचे दिसले. सदर इसमाला त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नावे देवेंद्र शिर्के, प्रशांत ढेंगरे, मोटघरे, विक्की बधवार व अरविंद साखरे असे सांगितले. त्यांच्याकडून ,आम्हाला कागदी पान, एक डॉट पेन, टिव्ही व नगदी ४०,०००/– असा एकूण ९५,०००/– किंमतीचा मुदेमाल मिळाला. सदर मुदेमाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी कारवाई करून जप्त केला. तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी माझा जबाब घेतला होता. आज

रोजी न्यायालयामध्ये आरोपी क्र.४ वगळता इतर चारही आरोपी हजर आहेत. मी त्यांना ओळखतो. सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिजवे यांनी केला.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी क्र.५ तर्फे विद्यीज्ञ श्री. व्ही. व्ही. साखरे यांच्यामार्फत–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पेट्रोलींग मध्ये असलेल्या सर्व कर्मचा–यांबाबत स्टेशन डायरीला स्वतंत्र नोंद घेतली जाते. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दिवशी पेट्रोलींगला उपस्थित नसल्याने त्याबाबत कोणतीही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली नाही.

**<u>उलटतपास आरोपी क्र.१ व ३ तर्फे विद्यीज्ञ श्री. आर. बी. ढोके यांच्यामार्फत–</u>**

३. मी माझे जबाबामध्ये घटनास्थळावरील आरोपींची नावे नमूद केलेली नाहीत. घटनेला बराच कालावधी उलटून गेल्याने प्रत्येक आरोपीचे नाव मी स्वतंत्ररीत्या सांगू शकणार नाही. त्यामधील एकाचे नाव मला सांगता येईल. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयामध्ये साक्षीकामी आल्यानंतर आज मला त्या एका आरोपीचे नाव सरकारी वकीलांकडून समजले. भारत पाकीस्तान सामना कोणत्या मालीकेमधला होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी आरोपींना प्रथमच न्यायालयात पाहिले, घटनास्थळावर कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे विद्यीज्ञ श्री.  पी. आर. भूरे यांच्यामार्फत–</u>**

४. जप्त टिव्ही कोणत्या कंपनीचे होते त्याचा खुलासा मी माझे पोलीसांना दिलेल्या जबाबामध्ये केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुदेमाल जप्त करण्याच्या कारवाईवेळी मी तेथे उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणतीही कारवाई झाली नाही व मी आरोपींना पहिल्यांदाच

न्यायालयात पाहिले. हे म्हणणे खरे नाही की, घटनेवेळी भारत पाकीस्तान यांच्यामध्ये कोणताही क्रिकेटचा सामना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by KAUSTUBH NAGESH MARATHE
Date: 2026.02.05 17:39:23 +0530

**नागपूर.** **(कौस्तुभ नागेश मराठे)**

**दि.०५/०२/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, नागपूर.**

**कोर्ट क्र.१**